

# खवले मांजराचे संवर्धन

जगातील सर्वात जास्त तस्करी होणाऱ्यासस्तन प्राण्यांचे अर्थात खवले मांजर (पँगोलिन)

**आपण कसे जतन करू शकतो ?**

पृथ्वीवर सस्तन प्राण्यांची वैविध्यता लक्षणीय आहे. त्यांचे आकार, विहार, वसतिस्थाने, खाण्या-पिण्याच्या शैलीत कमालीचे वैविध्य पाहायला मिळते. त्यापैकी खवले मांजर (शास्त्रीय नाव Manis crassicaudata) एक सजीव आहे. निसर्गातील सर्वात आकर्षक आणि इतर जगातील प्राण्यांपैकी एक, पँगोलिन, इतके अनोखेपणे बांधलेले आणि उत्क्रांतीदृष्ट्या विलक्षण आहे. त्याचे लक्षणीयवैशिष्ट्य म्हणजे त्वचेवरचे बाह्यकवच. शिकाऱ्या समोर बचावावेळी हे चिलखत उपयोगी पडते. जगात याच्या एकूण आठ प्रजाती असुन आफ्रिका आणि आशिया खंडात आढळतात. या प्राण्याला दात नसतात. जिभेची लांबी शरीराइतकी असल्याने मुंग्या आणि वाळवीवर उदरनिर्वाह करतो. एखादा धोका जाणवला तर स्वतःला स्वतःच्या शरीराभोवती गुंडाळून घेतो हेच त्याचे गुणविशेष. त्यामुळे त्वचेवरच्या खवाल्यांचा गुंडाळा उभारून दिसतो. हल्लेखोर घाबरतो. तितक्यात शरीराच्या गुंडाळीने घरंगळून निसटून जाऊन स्वतःची सुटका करतो. त्याचे इंग्रजी नाव ''पँगोलिन'' हे नाव मलय भाषेतून आले आहे. ''पेंग-गोलिंग'' या शब्दाचा अर्थ ''जो घरंगळतो''. त्याच्या चालण्याच्या लकबीवरून मराठीत मांजर असे म्हंटले गेले. खवले मांजर हे एकमेव असे सस्तन प्राणी आहेत ज्यांच्या त्वचेवर केराटिन पासून बनलेले चिलखत आहे. हे चिलखत त्याच घटकापासून बनले आहे ज्यापासून मानवी हातापायाची नखे बनली आहेत. शिकारीकडून संरक्षण होण्यासाठी विकसित झाले आहेत. परंतु हेच चिलखत आज त्यांच्या अस्तित्वासाठी सर्वात मोठा धोका बनले आहे. कारण खवले आणि शरीराच्या इतर भागांसाठी

बेकायदेशीरपणे त्याची शिकार करून व्यापार केला जात आहे. मुख्यत: पारंपारिक चिनी औषधासाठी हा प्राणी अधिक मारला जातो आहे. मागील तीन वर्षाच्या आकडेवारीनुसार जगभरात सरासरी १८०००० बेकायदेशीर खवली मांजरे व्यापारा दरम्यान संबंधित प्राधीकरणाने जप्त केली आहेत.

एखाद्या प्रजातीचे प्रभावीपणे संवर्धन करण्यासाठी शास्त्रज्ञांना तीन मुख्य घटकाबद्दल जाणून घेणे महत्वाचे ठरते.  पहिला, संकट ग्रस्त प्रजातीबद्दल असलेली उपलब्ध माहिती आणि त्यातील तफावत ओळखणे. दुसरा, प्रजातीच्या दुर्दशेबद्दल जनसामान्यामध्ये जागरूकता वाढवणे आणि तिसरा म्हणजे प्रजातीच्या अवनतीच्या प्रमुख कारणांचा सामना करणे आवश्यक असते. पण खवले मांजराविषयी अलीकडच्या काळापर्यंत खूप तुरळक माहिती उपलब्ध होती. अनेकांना व्यवहारा व्यतिरिक्त अधिक काही माहीत नसल्यामुळे संवर्धनासाठी आवशक असलेल्या पैलूंकडे लक्ष दिले गेले नाही. हायटन आणि गाऊबर्ट यांनी २०२१ मध्ये केलेल्या पुनरावलोकनात या मुद्द्याकडे पाहिले. त्यांनी १८६५ पासून खवले मांजराशी संबंधित प्रकाशने, स्वीकारलेल्या पेटंटवरील माहितीचा संच, बातम्या आणि सामाजिक आसक्तीचे विश्लेषण केले.



सदर अभ्यासातून शास्त्रज्ञांना खूप साऱ्या मुलभूत गोष्टी समजल्या. खवले मांजराची शारीरिक माहिती व त्याची रोगप्रतिकार क्षमता, व्यापारासाठी करण्यात येणारी शिकार व त्याचे गंभीर परिणाम या सर्वांच्या अभ्यासात लक्षणीय तफावत होती. खवले मांजराशी संबंधीत काही अभ्यास नैसर्गिक व कृत्रिम प्रजननाबद्दल सांगतात परंतु ते एकसमान नाहीत. गैर व्यापाराबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा आहेत परंतु संकटातून बचाव केलेल्या प्राण्यांच्या पुनर्वसनाबद्दल तोकडी माहिती उपलब्ध आहे. अनेक वर्षापासून करत आलेल्या व्यापाराचे पँगोलिनच्या संख्येवर होणारे परिणाम, लोकसंख्या घटण्याची अन्य कारणे आणि स्थानिक लोकांमधील खवले मांजराविषयी असलेल्या जाणीव व समजुती याबद्दल अद्यावत माहितीचा तुटवडा समोर आला. संशोधन वर्तुळात एक पूर्वग्रह असा आहे कि, काही प्रजाती किंवा काही भौगोलिक प्रदेश विशेषत: आफ्रिकेतील देश, यांचेइतर देशापेक्षा संशोधनाकडे लक्ष कमी दिले जाते. यावरून असा प्रश्न निर्माण होतो की, मूळतः पँगोलिनच्या दुर्दशेच संपूर्ण चित्र आपल्याला माहीत आहे का? नसेल तर ज्ञानाच्या या महत्त्वाच्या उणिवा आपण कशा प्रकारे भरून काढू शकतो?

२०२० मध्ये दक्षिण चीन कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी एक निवेदन जारी केले, ''कोव्हिड–१९ या साथीच्या रोगासाठी जबाबदार असलेल्या विषाणूचा संसर्ग होण्याचा खवले मांजर हा एक संभाव्य प्राणी आहे.'' या दाव्याचे समर्थन करणारा कोणताही ठोस पुरावा नसला तरी, याचा जनसामान्यात असा परिणाम दिसून आला की २०१५ नंतर हत्ती किंवा सिंह यांच्यापेक्षा खवले मांजराविषयी इंटरनेट वर अधिकाधिक माहिती

मिळवू लागले. अर्थात लोकांमध्ये या प्राण्यांविषयी चुकीची महिती पसरली. तसेच व्यापाराशी संबंधित धक्कादायक प्रतिमा समोर आल्या, विविध माहितीपट आणि जागतिक पँगोलिन दिनासारख्या वर्षातील महत्वाच्या दिवसांवर संवाद साधणारे गुगलडुडल देखील प्रसारित करण्यात आले.

परंतु आश्चर्य याचे वाटते जेव्हा मलेशियन अधिकाऱ्यांना जगातील सर्वाधिक तस्करी केलेल्या सस्तन प्राण्यांनी रलेली दोन गोदामे सापडली. संबंधित प्राधिकरणाने खवले मांजराचे तीस टन शारीरिक अवयवाचे भाग जप्त केले, हे आतापर्यंत पाहिलेले सर्वात मोठे पँगोलिन तस्करीचे दिवाळे म्हणून नोंदिले गेले. परंतु स्थानिक लोकांची यावर तीव्र प्रतिक्रिया उमटली नाही. अशारितीने, सार्वजनिक हित साधण्यासाठी योग्य मार्ग निवडल्यास खवले मांजराचे संवर्धन करण्यास मदत होऊ शकते.



खवले मांजरापासून बनलेल्या उत्पादनांशी संबंधित नोंदविलेले अनेक पेटंट चीनच्या पारंपारिक औषधामध्ये वापरले जातात. तथापि, ही औषधे अवैज्ञानिक असल्याचे दिसते. कारण ही उत्पादिते औषधांच्या कार्यक्षमतेवर आणि त्यांच्यापासून संभावणाऱ्या धोक्यावर प्रश्न उपस्थित करते. तसे असेल तर स्थानिक लोकांची या औषधांना मागणी का असते? त्यावरचा युक्तिवाद असा आहे की चीनी पारंपारिक औषधे ही हजारो वर्षांच्या सरावाचे फलित आहे. विविध आजारांसाठी परिपूर्ण औषधे निर्माण करण्याच्या या थोतांडापासून दूर असणे अपेक्षित आहे. अभ्यासादरम्यान संशोधकांना यकृताचे आजार, कर्करोग आणि अगदी एड्स बरा करण्याचा दावा करणाऱ्या औषधी पेटंटची उदाहरणे सापडली. हे केवळ चीनी पारंपारिक उत्पादने वापरण्याच्या कारणांच्या विरोधातच नाही तर असे सूचित करते की पँगोलिन पेटंट उत्पादनातून केवळ नफा मिळतो असा आणखी एक प्रेरणा यातून सूचित होऊ शकते. तथापि, या साऱ्या गोष्टींची खरी पुष्टी करण्यासाठी अधिक संशोधन आवश्यक आहे आणि पारंपारिक औषधे बनवण्यासाठी बेकायदेशीररित्या करण्यात येणारा व्यापार याविषयी अधिकाची स्पष्टता येणे आवश्यक आहे.

पँगोलिन कीटकांचे नियमन करून महत्त्वाची पर्यावरणीय भूमिका बजावतात. एक पँगोलिन दरवर्षी सुमारे ७० दशलक्ष मुंग्या आणि वाळवी खाऊ शकतो. यामुळे उपद्रव दूर करण्यासाठी लागणारे लाखो रुपये वाचवतात. ते नामशेष झाल्यास पर्यावरणावर मोठा आणि दूरगामी परिणाम होईल. म्हणून आज जगातल्या आठही खवले मांजराच्या प्रजाती जे संकटग्रस्त झाले आहेत त्यांना वाचवणे अत्यंत गरजेचे आहे.

**मूळ इंग्रजी लेखक –**
**सीन हायटन आणि फिलीपगाऊबर्ट**

**अनुवाद – राघवेंद्र वंजारी**
मोबा. ९०२८७६९१८२.